# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:06.04.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

- शेजारी देशांना प्राधान्य देण्याच्या धोरणानुसार आणि महासागर संकल्पनेच्या अनुषंगानं भारताकडून श्रीलंकेला सहाय्य - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- वक्फ सुधारणा विधेयकाला राष्ट्रपतींची मंजूरी ; विधेयकाचं कायद्यात रूपांतर.

- महसूल विभाग शासनाचा चेहरा ; तो अधिक लोकाभिमुख असावा – मुख्यमंत्री

- देशभरात आज रामनवमीचा उत्साह.

आणि

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कालच्या सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स संघाचा विजय

**पंतप्रधान श्रीलंका**

शेजारी देशांना प्राधान्य देण्याच्या धोरणानुसार आणि महासागर संकल्पनेच्या अनुषंगानं भारत श्रीलंकेला सहाय्य करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी काल श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा दिस्सानायके यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. त्यानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारताच्या किंवा क्षेत्रिय सुरक्षेला धोका पोहोचेल अशा प्रकारच्या कोणत्याही कृत्यासाठी श्रीलंका आपली जमीन वापरू देणार नाही अशी ग्वाही श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दिली. दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले. श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते पंतप्रधान मोदी यांना मित्र विभूषण हा सन्मान प्रदान करण्यात आला.

**पंतप्रधान-श्रीलंका**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके आज श्रीलंकेतल्या अनुराधापुरा इथं महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांचं उद्घाटन करणार आहेत.

भारतीय मदतीने विकसित केलेला हा 'महो-ओमानथाई' रेल्वे मार्ग श्रीलंकेच्या उत्तरेकडील भागाला राजधानी कोलंबोशी जोडेल,ज्यामुळं प्रादेशिक संपर्क वाढून आर्थिक विकासाला चालना मिळेल. याशिवाय 'महो-अनुराधापुरा' विभागातील प्रगत रेल्वे वाहतूक नियमन प्रणालीची पायाभरणीही आज करण्यात येणार आहे.

**रेल्वे पूल**

रामनवमीच्या शुभ मुहूर्तावर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आज तामिळनाडूमधल्या रामेश्वरमला मुख्य भूमीशी जोडणाऱ्या नवीन पंबन रेल्वे पुलाचं उद्घाटन करणार आहेत. 550 कोटी रुपये खर्चून बांधलेला हा पूल उच्च दर्जाचे संरक्षक रंग आणि पूर्णपणे वेल्डेड जॉइंट्स वापरून बांधण्यात आला आहे.यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते 8300 कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण होणार आहे. मोदी रामेश्वरम तांबरम एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवतील त्याचबरोबर रामेश्वरम मंदिरात जाऊन दर्शन घेतील.

**वक्फ मंजूरी**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी वक्फ सुधारणा विधेयक, 2025 ला मंजूरी दिली आहे. राष्ट्रपतींच्या मान्यतेनंतर या विधेयकाचं आता कायद्यात रूपांतरण झालं आहे. गेल्या गुरुवारी लोकसभेत हे विधेयक मंजूर करण्यात आले. 288 सदस्यांनी त्याला पाठिंबा दिला आणि 232 सदस्यांनी विरोधात मतदान केले. तर राज्यसभेत शुक्रवारी 128 सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूने मतदान केले तर 95 सदस्यांनी विरोधात मतदान केले. राष्ट्रपतींनी मुस्लिम वक्फ रद्द विधेयक, 2025 ला देखील मान्यता दिली आहे.

**मुर्मू दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्यापासून 10 तारखेपर्यंत पोर्तुगाल आणि स्लोवाकियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटी दरम्यान मुर्मू पोर्तुगालचे अध्यक्ष मार्सेलो रेबेलो डी सौसा यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा करतील. त्याचबरोबर पंतप्रधान लुईस मॉन्टेनेग्रो आणि राष्ट्रीय असेंब्लीचे अध्यक्ष जोस पेड्रो अगुआर-ब्रँको यांचीही भेट घेतील. स्लोवाकियामध्ये, राष्ट्रपती मुर्मू स्लोवाकचे अध्यक्ष पीटर पेलेग्रिनी आणि पंतप्रधान रॉबर्ट फिको यांच्याशी द्विपक्षीय बैठका घेतील.

**शहा**

31 मार्च 2026 पूर्वी छत्तीसगडसह संपूर्ण देशातून नक्षलवाद संपुष्टात येईल असं प्रतिपादन गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. छत्तीसगडमधील रायपूर इथं आढावा बैठकीत ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार नक्षलवाद पूर्णपणे नष्ट करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं सांगताना कोणत्याही परिस्थितीत नक्षलविरोधी मोहिमेची गती कमी होणार नसल्याचं शहा यावेळी म्हणाले.

**नक्षलवादी आत्मसमर्पण**

तेलंगणमध्ये काल 20 महिलांसह 86 नक्षलवादी पोलिसांना शरण आले. नक्षलग्रस्त भागात शांतता आणि सामान्य जनजीवन प्रस्थापित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमधला हा एक मोठा टप्पा आहे. शरण आलेल्या नक्षलवाद्यांना पुनर्वसनासाठी तत्काळ मदत म्हणून प्रत्येकी 25 हजार रुपये देण्यात आले. या नक्षलवाद्यांनी विशेषतः त्यांच्यातील महिलांनी यापुढे शांतता आणि विकासाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला असल्याचं तेलंगणचे पोलिस महासंचालक चंद्रशेखर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. दरम्यान, आंध्र प्रदेशातही 11 माओवादी पोलिसांना शरण आले. त्यांना पुनर्वसनासाठी लवकरच मदत दिली जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली.

**एराएनि**
देशात 'एक राष्ट्र, एक निवडणूक' प्रणाली लागू झाल्यास भारताचा विकासदर 1 पूर्णांक 5 टक्के वाढेल असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे. काल चेन्नई येथे झालेल्या एका चर्चासत्रात बोलताना त्यांनी देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात 4 कोटी 5 लाख रुपयांची वाढ होईल असं स्पष्ट करताना एकाच वेळी निवडणुका घेतल्यास 12 हजार कोटी रुपयांची बचत होऊ शकते, सीतारमण यांनी यावेळी सांगितलं.

**महसूल**
महसूल विभागातील सुधारणांच्या अनुषंगानं अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटांच्या शिफारशींवर चर्चा करुन त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी येत्या 15 ऑगस्टपासून करण्याचा प्रयत्न करण्यात येईल असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल पुण्यात महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यशाळेत बोलत होते. सर्वाधिक नागरिकांशी संबंध येणारा महसूल विभाग अधिकाधिक लोकाभिमुख असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महसूल विभाग शासनाचा चेहरा असतो. या विभागाच्या कार्यक्षमतेवर, पारदर्शकतेवर राज्याचं मूल्यमापन केलं जातं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्यात 12486 महसूल कार्यालयात 100 दिवसांचा कार्यक्रम राबवला जात आहे. या माध्यमातून महसूल कार्यालयांचा कायापालट करण्यात येणार आहे. तसंच कार्यालयांचं मूल्यमापन करून, कार्यक्षम कार्यालयांचा सन्मान करण्यात येईल असं फडणवीस यांनी सांगितलं. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक येण्यासाठी महसूल विभागानं कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, यासाठी गुंतवणूक संपर्क अधिकारीही नियुक्त करावा असा सल्ला त्यांनी दिला.

**रामनवमी**
आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतील राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या राममंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रादेखील काढल्या जाणार आहेत. अयोध्येत जगाच्या कानाकोपऱ्यातून भाविक आले आहे. यानिमित्त विविध मंदिरांमध्ये फुलांची आकर्षक सजावट तसंच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमीचा उत्सव लोकांना त्याग, नि:स्वार्थ प्रेम आणि दिलेला शब्द पाळण्याची शिकवण देतो. सत्य, धर्म आणि नैतिकतेचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भगवान राम हे केवळ एक पूजनीय देवता नाहीत तर एक राष्ट्रीय प्रतीक असून प्रभू श्रीराम यांनी उपदेश केलेल्या मूल्यांचे पालन आणि जतन केले पाहिजे असंही फडणवीस यांनी म्हटलं आहे.

भाजपा स्थापना
भारतीय जनता पक्ष आज आपला 45 वा स्थापना दिन साजरा करणार आहे. या प्रसंगी, भाजप अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा नवी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पक्षाचा ध्वज फडकवतील.

अमेरिका कर
अमेरिकेने कालपासून अनेक देशांमधून होणाऱ्या आयातीवर 10 टक्के कर लावण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आठवड्याच्या सुरुवातीला कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर या करामुळे अमेरिकेच्या विविध राष्ट्रांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

**म्यानमा**

म्यानमामधील झालेल्या भूकंपात मृतांचा आकडा 3354 वर पोहोचला आहे. तर 200 हून अधिक जण अजूनही बेपत्ता आहेत.भूकंपाच्या केंद्राजवळील मंडाले इथं संयुक्त राष्ट्रांचे मदत प्रमुख टॉम फ्लेचर यांनी मानवतावादी आणि सामुदायिक संस्थांच्या मदत कार्यांचे कौतुक केले. भारत आणि इतर देशांमधील पथके त्या ठिकाणी मदत करत आहेत.भारताने शनिवारी ऑपरेशन ब्रह्मा अंतर्गत म्यानमारला अतिरिक्त 442 टन अन्न मदत पोहोचवली आहे.

**मनोज कुमार**

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोजकुमार यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**बॉक्सिंग**

ब्राझीलमधील फोज दो इगुआचू इथं झालेल्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत भारताच्या हितेश गुलियाने इंग्लंडच्या ओडेल कामाराचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले. तर अभिनाश जामवालने रौप्यपदक पटकावले. अंतिम फेरीत अभिनाशला युरी रीसकडून पराभव पत्करावा लागला.मनीष राठोडने काल कांस्यपदक जिंकले.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये राजस्थान रॉयल्सने काल चंदीगड इथं झालेल्या सामन्यात पंजाब किंग्जचा 50 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने 205 धावा केल्या. यशस्वी जयस्वालने 45 चेंडूत 67 धावा केल्या. प्रत्युत्तरा दाखल, पंजाब किंग्जला 155 धावा करता आल्या. पंजाबकडून जोफ्रा आर्चरने 25 धावा देत 3 गडी बाद केले. आर्चरला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. तत्पूर्वी काल दुसऱ्या सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सने चेन्नई सुपर किंग्जचा 25 धावांनी पराभव केला. 184 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, चेन्नई सुपर किंग्ज संघाला 158 धावा करता आल्या. आज सनरायझर्स हैदराबाद आणि  गुजरात टायटन्स यांच्यात सामना होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**